सहायक अनुदानाच्या जलद संवितरण व संनियंत्रणासाठी आहरण व संवितरण अधिकारी यांना "आभासी वैयक्तिक ठेव लेखा" प्रशासक (VPDA) घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक : विसउस/का-४(अर्थ)/आ.वै.ठे.ले./२०२५-२६/प्र.क्र.५४२
जी.टी.हॉस्पिटल कॉम्प्लेक्स, ८ वा मजला,
लो.टि.मार्ग, मुंबई-४००००१.
दिनांक : १७/११/२०२६

वाचा :- शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दि.१४.०२.२०२४

प्रस्तावना :-

वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा ५, दि.१४ फेब्रुवारी २०२४ नुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना आणि अशासकीय कार्यान्वयन प्राधिकाऱ्यांना म.को.नि. नमुना क्र. ४४ देयकांद्वारे राज्याच्या एकत्रित निधीतून २७-लहान बांधकामे, ३१- सहायक अनुदान (वेतनेतर), ३३-अर्थसहाय्य,३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान, ५०- इतर खर्च, ५३- मोठी बांधकामे आणि वित्त विभागाव्दारे वेळोवेळी घोषित करण्यात येतील अशा अन्य उद्देश शीर्ष (Object Head) अंतर्गत आहरित केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी आभासी वैयक्तिक ठेव लेखा (Virtual Personal Deposit Account-VPDA) ही व्यवस्था व कार्यपद्धती लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामधील ११.१ मधील तरतूदीनुसार राज्याच्या एकत्रित निधीतून आहरित केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी क्षेत्रिय आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना आणि अन्य अशासकीय कार्यान्वयन प्राधिकाऱ्यांना वित्त विभागाच्या सहमतीने आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक म्हणून घोषित करण्यासाठी संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग सक्षम असतील त्यानुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांना "आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक" (VPDA) म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील सोबत जोडलेल्या "परिशिष्ट—क " मधील नमूद आहरण व संवितरण अधिकारी यांना म.को.नि.नमुना क्रमांक ४४ या नमुन्यातील देयकांव्दारे २७-लहान बांधकामे, ३१- सहायक अनुदान (वेतनेतर), ३३-अर्थसहाय्य,३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान, ५०- इतर खर्च, ५२, यंत्रसामग्री, ५३-मोठी बांधकामे आणि वित्त विभागाव्दारे वेळोवेळी घोषित करण्यात येतील अशा अन्य उद्देश शीर्ष (Object Head) अंतर्गत राज्याच्या एकत्रित निधीतून आहरित केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी "आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक" (VPDA) म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना यथास्थिती अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई किंवा संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय येथे आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA) उघडण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर आहरण व संवितरण अधिकारी महालेखापाल,(ले.व अ.) कार्यालयाकडून वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक म्हणून प्रत्यक्ष कामकाज करण्यासाठीचे प्राधिकारपत्र मिळविण्यासाठी महालेखापाल,(ले.व अ.) कार्यालयास प्रस्ताव सादर करतील आणि महालेखापाल,(ले.व अ.) कार्यालयाबरोबर योग्य समन्वय ठेवून असे प्राधिकारपत्र सत्वर प्राप्त करुन घेतील. महालेखापाल,(ले.व अ.) यांचेकडून प्राधिकारपत्र निगर्मित झाल्यानंतर संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून आभासी ठेव लेखा प्रशासक सांकेतांक देण्यात येईल,सदर कार्यवाही प्राधान्याने पूर्ण करवून घेण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकारी आणि त्यांचे कार्यालय प्रमुख व्यक्तिश: जबाबदार असतील.

आभासी वैयक्तिक ठेव लेखा कार्यपध्दतीचा अवलंब करताना तसेच या कार्यपध्दतीने निधी आहरीत तसेच खर्च करताना राज्य शासनासाठी कार्य नियमावली, वित्तीय नियम, अर्थसंकल्पीय नियम पुस्तीकेतील तरतूदी व सर्व अटी/शर्तींचे तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधिन शा.नि.क्र. संकिर्ण२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५,दि. १४ फेब्रुवारी २०२४ निर्णयात नमूद अटी/शर्ती यांचे पालन करण्याची जबाबदारी आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक यांची असेल.

सदरहू मान्यता महालेखापाल (ले.व अ.) कार्यालयाने नमूद केलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) The said VPDA shall be subject to Audit.

२) The Administrator shall ensure that all rules, regulations, terms and conditions of the relevant GR have been followed in respect of the said VPDA.

३) No amount shall be transferred to the VPDA to avoid lapse of fund.

४) VPDA is applicable only for State schemes and not for Central Sector and Centrally Sponsored Schemes.

५) The Receipt to the said VPDA through Nil Bill procedure, shall be only for the bills drawn under :

- **MTR-31B** for the object heads 27-Minor Works and 53-Major Works;
- **MTR-45B** for the object heads of expenditure 33-subsides and 50-Other Charges;
- **MTR-44** for the object heads of expenditure 31-Grants-in-Aid (Non Salary) and 35-Grants in Aid for creating of Capital Assets;
- **MTR-29** for the object head of expenditure 52-Machinery and Equipment shall be applicable from **1 April 2025.**

६) The Administrator shall timely submit the Utilisation Certificate in the prescribed format after incurring expenditure from the VPDA to the offices viz. O/o PAG (A&E)-I Mumbai, O/o PAG (A&E)-II Nagpur of O/o PAO, Mumbai as per the respective jurisdiction for the Bills drawn **under MTR-44** for the object heads of expenditure 31-Grants-in-Aid (Non Salary), 35- Grants-in-Aid for creation of Capital Assets.

For bills drawn under **MTR-31B, MTR-45B, MTR-29** the Utilisation Certificate shall be submitted to the concerned administrative departments.

७) The Expenditure from the VPDA shall be as per the Sanction order of the respective Grant.

८) The unspend balances under the VPDA shall be credited back to the Consolidated Fund after completion of one year (365 days) from the date of drawal of the funds/date of credit of amount to the VPDA or the timeline mentioned in the sanction order whichever is earlier.

९) The Monthly Plus Minus Memo shall be forwarded to this office by the respective treasury officer.

१०) The balances under the VPDA shall be reconciled monthly by the Administrator with the District Treasury Officer.

११) The balances shall be reconciled with the A.G. office by the Treasury Officer who shall submit the Balance Certificate to A.G. office for confirmation of their balances in the books of A.G. at the end of the Financial Year.

१२) All the conditions/instructions in the Finance Department G.R. No. संकिर्ण/२०२३/ प्र.क्र.११०/ २०२३/कोषा प्रशा-५, दि.१४.०२.२०२४ and GR No. संकिर्ण/२०२३/ प्र.क्र.११०/ २०२३/ कोषा प्रशा-५, दि.१२.०३.२०२५ shall be followed.

१३) All Rules of the Maharashtra Treasure Rules,1968 shall be applicable to the VPDA.

सदर शासन निर्णय वित्त विभाग/कोषा प्रशा-५अनौपचारिक संदर्भ क्र. १६६/२०२६ दि.२७.०४.२०२६ व कार्यासन व्यय-१० अनौपचारिक संदर्भ क्र. ४०१/व्यय-१० दि.१८.०५.२०२६ अन्वये तसेच महालेखाकार कार्यालय यांनी अनौपचारिक संदर्भ क्र. १३७६ दि.०८.१०.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६१११७१२०४१७०१०६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIKRAMSINH UJWALSINH YADAV

Digitally signed by VIKRAMSINH UJWALSINH YADAV
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fcscpd, 2.5.4.20=10B0814D6CFC086374A32A3DCE9BEBB7DDE238A5B8139006A817485BDD4F6802, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=86BF376DFB56A4A3506714BF7EA767097E227BB4413D0A42CD1D1766701758AF, cn=VIKRAMSINH UJWALSINH YADAV
Date: 2026.11.17 12:05:15 +05'30'

(विक्रमसिंह यादव)
वित्तीय सल्लागार व उपसचिव

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
४. मा. मंत्री, वित्त यांचे खाजगी सचिव.
५. मा. विरोधी पक्ष नेते (विधानसभा, विधानपरिषद)
६. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव.
७. मा. मंत्री / राज्यमंत्री (सर्व)यांचे खाजगी सचिव.
८. मा.महालेखाकार, महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर
९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महा संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१०. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
११. अपरमुख्य सचिव, (वित्त) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.
१३. संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई.
१४. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
१५. सर्व विभागीय आयुक्त.
१६. सर्व जिल्हाधिकारी,
१७. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
१८. सर्व उप आयुक्त (पुरवठा),
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी,
२१. सर्व उपनियंत्रक (शिधावाटप) कार्यालये.
२२. सर्व सहसचिव/उपसचिव, अ.ना.पु. व ग्रा.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३. सर्व कार्यालये (परिशिष्ट क मधील)
२४. निवडनस्ती.

परिशिष्ट-क

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग व अधिनस्त जिल्हा आयोग कार्यालय

अ. क्र.	कार्यालयाचे नांव	आहरण व संवितरण अधिकारी क्रमांक	आहरण व संवितरण अधिकारी यांचे पदनाम
१	जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, पालघर	१६०१००५३७४	प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, पालघर